# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०५/२०२५ (गुरूवार)**

---

## खापरखेडा पोलीस स्टेशन अदखलपात्र अपराध क्र. २९४ /२०२५

दिनांक २१/०५/२०२५ रोजी फिर्यादी नामे कु आरोही राधेलाल राठोड, वय ३६ वर्षे, रा. नाईक ले आऊट, शिवमंदीर जवळ, सावनेर, जि. नागपुर यांनी रिपोर्ट दिली की, फिर्यादी या सावनेर तहसिल येथे तलाठी या पदावर कार्यरत असुन त्यांचे कडे भानेगाव आणि सिल्लेवाडा हे दोन गावाचे कामकाज आहे. दिनांक २१/०५/२०२५ रोजी सकाळी १०:०० वा फिर्यादी या चनकापुर आणि पोटा गावचे तलाठी श्री सुमित अशोकराव कांबळे यांच्यासह वलणी रेती घाट येथे महाराष्ट्र शासनाच्या घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांना मोफत रेती वाटपाचे काम करण्याकरीता गेले असता दुपारी ०२:३० ते ०४:०० वाजेच्या सुमारास अज्ञात इसमांनी रेती घाटापासुन सुमारे ५०० मिटर अंतरावर उभे असलेले फिर्यादी कु आरोही राधेलाल राठोड यांचे खाजगी वाहन टाटा टियागो गाडी क्रं एम एच ४० बी.जे. ५६३६ आणि श्री सुमित कांबळे यांचे खाजगी वाहन होंडा युनिकॉर्न गाडी क्रं एम. एच .४० बी.एस. २७७१ यांची तोडफोड केली आहे अशी फिर्यादी कु आरोही राधेलाल राठोड, वय ३६ वर्षे,रा. नाईक ले आऊट शिवमंदीर जवळ, सावनेर, जि, नागपुर यांनी स्वत: लिहुन आणलेली अदखलपात्र गुन्हयांची तक्रार पोलीस स्टेशन खापरखेडा येथे दिल्याने फिर्यादीच्या तक्रारीवरून पोलीस स्टेशन खापरखेडा येथे अदखलपात्र गुन्हयांची नोंद करण्यात आली आहे.

नमुद घटनेची माहीती प्राप्त होताच मा.श्री रमेश धुमाळ, अपर पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन फिर्यादी कु आरोही राधेलाल राठोड, श्री सुमित कांबळे आणि श्री देवेंद्र नाखले ,मंडळ अधिकारी,महसुल वलनी सर्कल यांची

विचारपुस केली असता त्यांच्या कडुन माहीती प्राप्त झाली की, नमुद वाहनांची तोडफोड करतांना त्यांनी कोणालाही बघितले नाही तसेच फिर्यादी किंवा त्यांच्या विभागाकडुन कोणत्याही पोलीस संरक्षणाची मागणी करण्यात आलेली नव्हती.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद उपविभागिय पोलीस अधिकारी ,उमरेड विभाग यांची कारवाई

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २१/०५/२०२५ रोजी श्रीमती वृष्टी जैन (भा.पो.से) सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग, उमरेड या त्यांच्या पथकासह पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. सदर माहीतीवरून श्रीमती वृष्टी जैन यांनी त्यांच्या पथकासह पोस्टे उमरेड अंतर्गत मौजा देनी शिवार, तारणा रोडवर नाकाबंदी करून खालील प्रमाणे कारवाई केली.

**कारवाई क्रमांक १ :—** नाकाबंदी दरम्यान एक टाटा कंपनीचा ट्रक क्रं. एम. एच. २७ डी. एस. ५२७९ हा मिळून आल्याने वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालकाला नाव पत्ता विचारले असता चालक आरोपी नामे शकिल हबिब शेख, वय ४८ वर्ष, रा. पॅरामाउंट कॉलनी, अमरावती अशी माहीती मिळाली. त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचारणा केली असता वाहन मालक आरोपी नामे अभिजीत केसरवाणी, रा. चेतनदास बगीचा अखाडा, मसनगंज, अमरावती अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) एक टाटा कंपनीचा ट्रक क्रं. एम. एच. २७ डी.एस ५२७९ किंमती २०,००,०००/— रूपये व २) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये आणि असा एकुण २०,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्रमांक २ :—** नाकाबंदी दरम्यान एक टाटा कंपनीचा ट्रक. क्र. एम. एच. २८ बि. बि.६०६६ हा मिळून आल्याने वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहनामध्ये चालकासह अजुन एक इसम मिळुन आला. त्यांना नाव पत्ता विचारले असता चालक आरोपी नामे गजेंद्र धनराज इनवाते, वय २७ वर्ष. रा. उमरखेडा, ता. मोर्शी,जि. अमरावती, क्लिनर आरोपी नामे पवन उईके, रा. पोसला, ता. वरुड, जि. अमरावती हे मिळुन आले. त्यांना रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचारणा केली असता वाहन मालक आरोपी नामे प्रितम एकनाथ बेलोकर, रा. गांधीनगर जवळ, मलकापूर, रोहीनी हॉटेल, बूलढाणा अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.पोलीसांनी पंचासमक्ष १) एक टाटा कंपनीचा ट्रक क्र एम एच २८/बि.बि.६०६६ किंमती २०,००,०००/रूपये व २) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/— रूपये आणि असा एकुण २०,५०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**सदर कारवाईत २० ब्रास रेती आणि २ वाहनासह एकुण ४१,००,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद प्रकरणी वर नमुद आरोपीतांवर कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम, सह कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये दोन गुन्हे नोंद करण्यात आले आहे.




## <u>अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद</u>
## <u>मौदा पोलीसांची कारवाई</u>

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २१/०५/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. सदर माहीतीवरून मौदा पोलीसांनी मथनी टोल नाका येथे वाहनांची तपासणी केली असता १२ चक्का ट्रक क्र. एम.एच. ४० बि.जी. ८७७८ हा मिळून आल्याने वाहनाला थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. ट्रक चालक आरोपी नामे जयेश दामोदर धूळसे, वय २८ वर्षे, रा. नवरगाव जि भंडारा याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाबाबत विचारणा केली

असता वाहन मालक आरोपी नामे मिलींद मेहर, जि. भंडारा अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष १) १२ चक्का ट्रक क्र. एम.एच. ४० बि.जी. ८७७८ किंमती २५,००,०००/— रूपये व २) ११ ब्रास रेती किंमती ५५,०००/— रूपये आणि असा एकुण २५,५५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद प्रकरणी आरोपीतांवर कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, सहकलम ४८ (८),४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम, सह कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **वाहन चालक आरोपीस अटक करण्यात आली आहे.**

## पोस्टे खापरखेडा हद्दीत सट्टापट्टी लिहणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २२/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे पथक अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, मौजा नांद घाट चे जवळ बंद असलेल्या पेपरमिलचे मागे असलेल्या झाडाखाली काही इसम कागदावर डायमंड ,प्रभात कल्याण ,वरली मटक्याचे आकडे लिहुन लोकांकडुन पैसे घेवुन हारजितचा जुगार खेळवीत आहे. अशा माहिती वरून पोलीस पथक सापळा रचुन घटनास्थळी गेले असता आरोपी नामे १) छोटु गोपल करसयाल, वय ३२ वर्षे, रा. न्यु नांदा, कोराडी आणि २) साबीर तमीज शेख, वय ३३ वर्षे, रा. कोराडी हे दोघे लोकांकडुन पैसे घेवुन जुगार खेळवितांना दिसुन आले. त्यांना जागीच पकडुन अरोपीतांच्या ताब्यातुन, सट्टापट्टीचे सहीत्य, रोख रक्कम ३,६०० /— रूपये, दोन ॲड्राईड मोबाईल तसेच घटनास्थळावरून टिव्हीएस ज्युपीटर क्रमांक एम. एच. ४० टी.०७८२ ,होंडा ॲक्टीव्हा क्रमांक एम. एच. ४० सी. जी.४३१० अशी दोन वाहने **असा एकुण किंमती १,४८,६१०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपतांविरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम सह कलम ४९ भा.न्या. सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने